शिक्षक–प्रशिक्षणातील (B.Ed.) प्रात्यक्षिक उपक्रमांचा ग्रामीण व ाहरी भागातील प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावरील प्रभावाचा अभ्यास

शिक्षणशास्त्रातील विद्यावारिधि (पीएच.डी.) करिता जे.जे.टी. विश्वविद्यालयास

सादर केलेली संशोधन रूपरे ाा

संशोधिका

सौ. ह िनी दामोदरजी पात्रे

पंजी. सं. ९१०१०४०७

मार्गदर्शक

डॉ. केशर आर. जाधव

सह - प्राध्यापक

पंजी. सं. JJT\2K9\edu\0062

श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय

चुडेला, झुन्झुनू, राजस्थान

ैक्षणिक व ि २०१०

संशोधन ी िक	:	शिक्षक–प्रशिक्षणातील (**B.Ed.**) प्रात्याक्षिक उपक्रमांचा ग्रामीण व ाहरी भागातील प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावरील प्रभावाचा अभ्यास
संशोधिकेचे नाव	:	सौ. ह र्नी दामोदरजी पात्रे
पंजी. सं.	:	९१०१०४०७
ाखा	:	शिक्षणशास्त्र
मार्गदर्शकाचे नाव	:	डॉ. केशर आर. जाधव
हुद्दा	:	सह प्राध्यापक
पंजी. सं.	:	JJT\2K9\edu\0062
मार्गदर्शकाचे कामाचे ठिकाण	:	चेंबूर सर्वंकश शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर, मुंबई –७१.

प्रस्तावना

शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया होय. मानवी जीवनाला संस्कार संपन्न वळण लावण्याचे काम शिक्षणाचे आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हे शिक्षणाचे सर्वमान्य ध्येय आहे. शिक्षणाचे मुख्य कार्य मनुष्य बनविणे हे होय. असे शिक्षण शाळेच्या माध्यमातून औपचारिक रुपात मिळत असते. शाळेमुळेच विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेल्या आंतरिक गुणांच्या प्रकटीकरणाला वाव मिळू लागतो. विद्यार्थ्यांच्या या गुणांना निखारण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकांचे होय. शिक्षकांनी विद्यार्थ्यांतील योग्य त्या गुणांना पारखले तर महात्मा गांधी,स्वामी विवेकानंद, डॉ बाबासाहेब आंबेडकर,डॉ अरविंद घोष,गुरुवर्य रविंद्रनाथ टागोरांसारखे महान तत्वज्ञ तयार होतील. योग्य वेळी योग्य वळण लावले नाही तर मात्र याच विद्यार्थ्यांना बिघडण्यास अवधी लागणार नाही. म्हणूनच शाळेतील विद्यार्थी संख्या उत्तरोत्तर वाढत आहे. समाजात याच शिक्षणाचे प्रत्यक्ष रुप नागरिकांमध्ये दिसून येते. योग्य वळण लागलेले किंवा असलेले व्यक्ती एक जबाबदार नागरिक म्हणून समाजात प्रतिष्ठेने वावरतात. यामुळेच आज समाज –शाळा –शिक्षक – विद्यार्थी यांच्या परस्पर संबंधांना अर्थ प्राप्त झाला आहे.

या प्रक्रियेत शिक्षकाची महत्वाची भूमिका आहे. आजचा विद्यार्थी चौकस बुध्दिमत्ता असलेला, गतिमान, ज्ञानधिष्ठित समाजात टिकाव धरणारा हवा असे शिक्षकांना प्रथम वाटणे गरजेचे आहे. तेव्हाच शिक्षक त्या दृष्टीने प्रयत्न करण्यास सज्ज होईल. याच शिक्षकांच्या विचारांचे रुप विद्यार्थ्यांच्या रुपाने समाजपर्यंत जाऊन पोहचेल. शिक्षक हा केवळ शिकविण्या पुरताच न राहता समाज विकासाचा एक महत्त्वाचा घटक व्हावा या दृष्टीने शिक्षकाने केवळ चार भिंतीच्या आत विद्यार्थ्यांना न शिकविता चार भिंतीच्या बाहेरील बिनभिंतीची एक मोठी शाळा आहे त्या शाळेतही शिकवायला हवे. हीच ती जगाची शाळा होय. या जगात विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने वावरता यायला पाहिजे.

शिक्षकाला शिकविण्यापेक्षा विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिकण्याच्या आंतरिक इच्छेसाठी प्रवृत्त करणे महत्त्वाचे आहे. कारण-

Good teacher makes good School,

Good school makes good Students,

Good students make good Citizens,

and Good citizens make good Nation.

म्हणूनच राष्ट्रनिर्मितीच्या या कार्यात शिक्षक–प्रशिक्षण महाविद्यालयावर मोठी जबाबदारी येते. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेची सुरुवात एका शिक्षकापासूनच होते. पुढील आकृतीवरुन अधिक स्पष्ट होईल.



वरील आकृती वरुन आपणास अध्यापक–शिक्षणाचे महत्त्व लक्षात येते. राष्ट्र विकासाच्या कार्यात सर्वात महत्वाचे अध्यापक–शिक्षण आहे. समाजासाठी लागणारे नागरिक आज शाळेत अध्ययन करीत आहेत. या विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विकास करणे हे महत्वाचे काम शिक्षकांना करावे लागणार आहे. शिक्षकालाच विद्यार्थ्याला एकलव्य बनवायचे आहे. या निर्मितीसाठी शिक्षक – प्रशिक्षण महाविद्यालयाची महत्वाची भूमिका आहे.

बदल हा निसर्गाचा नियम आहे. स्थितीशील असे काहीच नाही. आज सर्वच क्षेत्रात झपाटयाने बदल होत आहे. आज मुख्यत: ज्ञानाचा विस्फोट (Knowledge Explosion) जनसंख्या विस्फोट (Population Explosion) तसेच अपेक्षा विस्फोट (Expectation Explosion) झाल्याचे दिसून येते. या अफाट जनसागराला क्षणाक्षणाला दुप्पट होणारे ज्ञान, तितक्याच त्याच्या अपेक्षा पुर्ण करणे शिक्षण क्षेत्राला एक आव्हानच आहे, या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी शिक्षकाला सज्ज असणे आवश्यक आहे. या विशाल जन–संख्येला हे अफाट ज्ञान कमीत कमी वेळेत संक्रमित करणे ही समस्या असून ही जबाबदारी शिक्षकांना पार करायची आहे. या करीताच देशाच्या शिक्षण – पध्दतीला योग्य अध्यापक उपलब्ध करुन देणे हीच शिक्षक – शिक्षणाची जबाबदारी होय.

शिक्षक – प्रशिक्षणाची उद्‌दिष्टे (माध्यमिक स्तर) (NCTE)

शिक्षक – प्रशिक्षणाची उद्‌दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) माध्यमिक शिक्षणाचे स्वरुप, हेतू आणि त्यामागचे तत्वज्ञान समजून घेण्यास सक्षम बनविणे

२) विदयार्थ्यांचे मानसशास्त्र व सामाजिकरणाची प्रक्रिया समजून घेण्यास सक्षम बनविणे

३) अध्यापनशास्त्र, अभ्यासक्रम निर्मिती, अभ्यासक्रमांचे विदयार्थ्यांमध्ये संक्रमण करणे व मूल्यमापन करण्याची क्षमता प्राप्त करणे.

४) माध्यमिक स्तरावरील आपल्या विषयाचे अध्यापन शास्त्रीय विश्लेषण करता येणे.

५) शिक्षण प्रणाली व वर्ग वातावरणावर प्रभाव टाकणारे घटक माहित करुन देणे.

६) विशेष गरजा असलेल्या बालकांच्या शैक्षणिक गरजा पुरविण्यास सक्षम बनविणे.

७) शिक्षणासाठी समाजातील विविध स्त्रोतांचा वापर करणे.

८) संप्रेषण कौशल्ये विकसित करणे आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात करता येणे.

९) सौदर्यदृष्टीबाबत संवेदनशीलता विकसित करणे.

१०) संशोधन प्रकल्प समजावून घेणे.

ही उद्‌दिष्टे पूर्ण करण्यासाठी शिक्षण महाविद्यालयाला आपल्या कार्यक्रमाचे आयोजन त्याप्रमाणेच करायला हवे. जेणेकरुन ही उद्‌दिष्टे या अभ्यासक्रमांतर्गात पूर्ण होतील. शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवायची असेल, आम्हाला हवे तसे भारताचे भविष्य बनवायचे असेल, सर्व क्षेत्रांना उत्कृष्ठ नेतृत्व पुरवयाचे असेल तर आपल्याला सर्व परीने प्रयत्न करायलाच हवे. तरच आपले माजी रा ट्रपती डॉ. अब्दूल कलामांचे भारताला महासत्ता बनवायचे स्वप्न पूर्ण करावयास अवलंब लागणार नाही.

प्रस्तुत संशोधनात शिक्षक – प्रशिक्षणांतर्गत येणाऱ्या पुढील उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

शिक्षण प्रशिक्षणांतर्गत घेण्यात येणारे उपक्रम पुढीलप्रमाणे--



या सर्व उपक्रमाव्दारे प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात कशा प्रकारे प्रभाव पडतो याचा ाोध घेण्याचा प्रयत्न हया संशोधनाव्दारे करण्याचा प्रयत्न संशोधिकेने केलेला आहे.

संबंधित साहित्याचा आढावा

नवे संशोधन हाती घेण्याआधी या वि ायाशी संबंधित संशोधने बघणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे आपणांस आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्याच्या आणि या झालेल्या संशोधनाचा संबंध किती व कसा आहे. आपण याशिवाय काय अधिक योग्य विचार करू ाकतो यावि ायी अंदाज येतो. संशोधकाला संपूर्ण संशोधनाची माहिती या संबंधित साहित्याद्वारे मिळू ाकते.

सदर संशोधननासाठी संशोधिकेने घेतलेले संशोधन आढावा पुढील प्रमाणे :–

श्रीवास्तव कांतीमोहन (१९८२) 'शिक्षक शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता' यांच्या संशोधनाचे उद्दि टे पुढीलप्रमाणे.

१) शिक्षक–शिक्षक कार्यक्रमाच्या सद्दस्थितीचा अभ्यास करणे.

२) कार्यक्रमाचा गुणात्मक आणि संख्यात्मक वैशि टयांचा अभ्यास करणे.

३) छात्र शिक्षकांच्या अध्यापन वृत्तीवर या कार्यक्रमाची परिणामकारतेचा अभ्यास करणे.

निष्क र्ा : १) सर्व १० महाविद्यालयांना ाासनाची अनुदान प्राप्त आहे तरीही महाविद्यालयात पुरेशा सोयी उपलब्ध नाहीत. २) विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण १:१४ आहे. हे प्रमाण ाासनाच्या नियमाप्रमाणे नाही. ३) सर्व वि ायांना पात्र शिक्षक नाहीत.

मोहन के. (१९८०) 'शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता' यांना या संशोधनाद्वारे लक्षात आलं कि बऱ्याच शिक्षण महाविद्यालयात योग्य इमारत नाही. ााळेतील सरावपाठासाठी ााळा बऱ्याच महाविद्यालयांना नाहीत. मुलीसाठी वसतीगृह नाहीत. ााळा महाविद्यालयापासून फारच लांब आहेत.

यादव घमंडीलाल (१९९२) 'प्रशिक्षणार्थ्यांच्या काही व्यक्तिमत्वातील वैशि टयांवर शिक्षक प्रशिक्षणाचा प्रभाव'

उद्दि टे : १) प्रशिक्षणार्थ्यांची स्व–संकल्पना प्रशिक्षणापूर्वी व प्रशिक्षणानंतर कशी आहे याची तुलना करणे.

२) प्रशिक्षणार्थ्यांची सामाजिक परिपक्वता प्रशिक्षणापूर्वी व प्रशिक्षणानंतर कशी आहे यांची तुलना करणे.

३) शिक्षकी पेशा बदलची वृत्ती प्रशिक्षणापूर्वी व प्रशिक्षणानंतर काय आहे. याची तुलना करणे.

निष्क र्ा :– १) शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाने प्रशिक्षणार्थ्यांची स्व–संकलपनेत स्प टता आली.

२) सामाजिक परिवक्वता प्रशिक्षणांतगर्त अधिक वाढीस लागली.

बोराटे मनोज कांता (२०१०) 'छात्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास ?

उद्दि टे – अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वातील समाजशीलता आत्मविश्वास व महत्वाकांक्षा या गुणांचा अभ्यास करणे. नि क र्ा व्यक्तिमत्वातील तिनही गुण विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनी मध्ये चांगल्याप्रकारचे असल्याचे दिसून आले.

जमदाडे प्रकाश व पांढरे विद्युकता (२०१०) 'बी. एड. प्रशिक्षणार्थीवर पर्यवेक्षित अभ्यास व लेखन प्रकल्प उपक्रमाच्या झालेल्या परिणाम कारकतेचा अभ्यास'

उद्दि टे : प्रशिक्षणार्थीसाठी पर्यवेक्षित अभ्यास व लेखन प्रकल्प उपक्रमाचे नियोजन व आयोजन करणे. उपक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

नि क र्ा : पर्यवेक्षित अभ्यास व लेखन प्रकल्यामुळे विद्यार्थ्यांत चांगल्या अभ्यास सवयी विकसित झाल्या विद्यार्थ्यांच्या ौक्षणिक गुणांत वाढ दिसून आली.

मोगरे विश्वास दौलतराव (२००४) 'चंद्रपूर ाहरातील अध्यापक विद्यालयात छात्रध्यापकांच्या विकासाच्या दृ टीने घेण्यात येणाऱ्या अभ्यासपूरक कार्यक्रमांचे चिकित्सक अध्ययन'

उद्दि टे : अभ्यासपूरक कार्यक्रम कोणकोणते राबविले जातात व याद्वारे छात्रअध्यापकांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

नि कर् : चंद्रपूर जिल्हातील दोन्ही अध्यापक विद्यालयात सांस्कृतिक, बौधिक, सामाजिक, कलात्मक, खेळ इ, अभ्यासपूरक कार्यक्रम राबविले जातात. ९० टक्के विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होतात. १०० छात्रअध्यापक अभ्यासपूरक कार्यक्रमांना भवि याच्या प्रगतीचे दार समजतात.

मोरे माधुरी (२००५) 'नागपूर ाहरातील डी. एड. प्रशिक्षण्यार्थ्यांची अध्यापन अभियोग्यता आणि त्यांच्या व्यक्तिमत्व घटकांचा चिकित्सक अभ्यास'

उद्दि टे :– १) डी. एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन अभियोग्यता व व्यक्तिमत्व घटकांचे मापन करणे. २) प्रशिक्षणार्थ्यांच्या प्राप्त अध्यापन अभियोग्यता गुणांकाचया आधारे विभागणी करणे. या आधारे व्यक्तिमत्व व्यक्तिचित्र तयार करणे.

नि कर् :– उच्च अध्यापन अभियोग्यता धारक डी. एड. प्रशिक्षणार्थी मुले व मुली यांच्या अध्यापन अभियोग्यतेत सार्थक फरक आढळून आला नाही.

घोंगडे राजू लक्ष्मण (२००९) 'अनुदानीत व विनाअनुदानीत अध्यापक विद्यालयातील वातावरणाचा विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासावर होणारा परिणाम'

उद्दि टे : १) अनुदानीत व विना अनुदानीत अध्यापक विद्यालयातील ैक्षणिक वातावरणाचा ोध घेणे. २) दोन्ही अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा व्यावसायीक अभियोग्यतेचा, व्यावसायिक अभिरूचीचा अभ्यास करणे.

नि कर् : १) विनाअनुदानीत अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्याच्या तुलनेत अनुदानीत अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा अधिक उपलब्ध आहेत. २) विनाअनुदानीत अध्यापक विद्यालयात ैक्षणिक वातावरण पो क नाही व या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक विकास कमी झाल्याचे आढळतात. ३) विना अनुदानीत अध्यापक विद्याल्यातील विद्यार्थ्यांत नम्रता विवेकशील, आज्ञाकारी, समजदारपणा या गुणांचा म्हणजेच भावनात्मक विकास जास्त झालेला आहे. ४) अनुदानीत अध्यापक विद्याल्यातील व विना अनुदानीत अध्यापक विद्याल्यातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात सार्थक फरक आहे.

लघाटे ाल्मली श्रीपाद (२००७)'शिक्षक प्रशिक्षणातील सूक्ष्म अध्यापन तंत्राच्या परिणामकारकतेचा अभ्यास'

उद्दि टे : १) सूक्ष्म अध्यापनाच्या कृतिसत्रापूर्वी प्रशिक्षणार्थ्यांच्या वर्ग – अध्यापनाचे खालील कौशल्यांच्या संदर्भात निरिक्षण करणे. स्प टीकरण, प्रश्नविचारणे, प्रबलन, चेतक बदल, फलक

लेखन. २) सूक्ष्म अध्यापन कृतिसत्रामध्ये प्रशिक्षणार्थ्यांच्या वर नमुद केलेल्या कौशल्यांच्या पृथकपणे आणि ोवटी संघटित स्वरूपात सराव करून घेणे.
नि क ा : सूक्ष्म अध्यापनाच्या सरावामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापनातील स्प टीकरण, प्रश्न विचारणे, प्रबल्ब, चेतक–बदल, फलक लेखन या कौशल्यांमध्ये प्रगती होते. प्रगतीचे प्रमाण वैयक्तिक वेगवेगळे असते.

कौर एच आणि मिनाक्षी (२००७) 'शिक्षक –प्रशिक्षण कार्यक्रमाचा बी. एड. विद्यार्थ्यांवर परिणाम'
उद्दि टे : १) शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातील तीन विविध स्तरावर व्यक्तिमत्वाची वैशि टे व अध्यापनासंदर्भातील प्रेरित व वृत्ती यांच्या (प्रवेश स्तर, मध्य स्तर, अंतिम स्तर) परिणाम अभ्यासणे.
नि क ा : १) या अभ्यासाद्वारे लक्षात आले की प्रेरितांच्या परिणाम फारच कमी होतो. तीनही स्तरावरील विद्यार्थ्यांनी ९, १६, २० नंबरच्या, प्रेरीतांना आपली पसंती दर्शविली नाही. २) शिक्षकी पेक्षा संदर्भात विद्यार्थ्यांची इच्छा कायम ठेवण्यात बी. एड. प्रशिक्षण कार्यक्रम अयशस्वी ठरले.

मायगोंडा मलगोंडा (२००८) 'शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचा नेतृत्व वर्तन विकास'
उद्दि टे : १) शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थांच्या नेतृत्व वर्तनांचा ोध घेणे. २) बी. एड. आणि बी. ए. बी. एड. प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या नेतृत्व वर्तन विकास प्रमाणांची तुलना करणे.
नि क ा : १) पूर्व चाचाणीच्या तुलनेत उत्तर चाचणीमध्ये प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व वर्तन विकासात सार्थक वाढ झालेली दिसून येते. २) पदवी प्राप्त शिक्षक प्रशिक्षणार्थीच्या नेतृत्व वर्तन विकासाच्या प्रमाणापेक्षा पदत्युत्तर शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचा नेतृत्व वर्तन विकासाचे प्रमाण जास्त आढळुन आले.

खान ए. एच. (१९८५) 'विद्यार्थ्यांच्या संपादनात सूक्ष्म अध्यापन तंत्राची परिणामकारकता'
उद्दि टे : १) प्रस्तावना, प्रश्नविचारने, उदाहरणसहित दाखले, फळकलेखन, समारोप करणे या कौशल्यांच्या विकासात सूक्ष्मअध्यापन तत्रांची परिणामकारकता वर्ग अध्यापनात तपासणे.
नि क ा : १) सूक्ष्म अध्यापन कौशल्ययुक्त असल्यास अधिक परिणाम करतात. २) पारंपारिक पद्धती पेक्षा सूक्ष्म अध्यापन पद्धती ही शिक्षक प्रशिक्षण तंत्रातील प्रभावी तंत्र आहे.

श्रीवास्तव मधुबाला (१९८९) 'लखनौ विद्यापीठातील छात्र–शिक्षकांच्या वृत्ती व अध्यापन कार्यक्षमतेवर शिक्षक शिक्षणाच्या कार्यक्रमाचा परिणाम'
उद्दि टे : १) बी. एड. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे वृत्ती, योग्यता व अध्यापन कार्यक्षमतेतील बदलाचा ोध घेणे. ते पुढील प्रमाणे २) लिंग, वि ाय, ैक्षणिक पात्रता व अध्यापन अनुभवानुसार तुलना करणे.

नि क र्ष : १) बऱ्याच प्रशिक्षणार्थी समुहातील बदल हा प्रशिक्षणानंतर सकारात्मक व महत्वपूर्ण झाल्याचे आढळते. २) अनुभवी शिक्षक प्रशिक्षणार्थी आपल्या वृत्ती बदल झाल्याचे दाखवत नाही. ३) स्त्री प्रशिक्षणार्थी व पुरू ा प्रशिक्षणार्थ्यांतील बदल लक्षणीय नाही.

देव, डी. एस. (१९८५) 'शिक्षक प्रशिक्षण संस्थेतील सराव पाठा व्यतिरिक्त प्रात्यक्षिक कार्यक्रमाचा अभ्यास'

उद्दि टे :१)शिक्षक शिक्षण कार्यक्रमात प्रात्याक्षिक कामाची भूमिकेचा अभ्यास करणे. २) प्रात्याक्षिक कार्यक्रमाची अंमलबजावणी कशी केली जाते त्याचा अभ्यास करणे. ३) छात्र–शिक्षकांचे प्रात्याक्षिकाच्या उद्दि टांचे अवबोधाचा सर्वे करणे.

नि क र्ष : १) बऱ्याच छात्र शिक्षकांना वेळेच्या अभावी सर्व प्रात्याक्षिक कार्यक्रमाची उद्दि टे संपादन करू ाकत नाही असे म्हणणे आहे. प्रत्येक प्रात्याक्षिक कार्यक्रमाकरीता योग्य मार्गदर्शन मिळत नाही. कार्यक्रमांचा वेळापत्रकात उल्लेख नसतो. अभ्यासानुसार कार्यक्रमाचे संघटन विद्यार्थ्यांच्या रूची प्रमाणे व गरजे नुसार नसतात.

प्रभुतेंडोलकर नितिन (२०१०) 'नेतृत्वगुण विकसनात सहशाळेय कार्यक्रमांची भूमिका'

उद्दि टे : १) माध्यमिक ाळांमध्ये सहशालेय कार्यक्रमांतर्गत घेतले जाणारे विविध उपक्रम अभ्यासणे. २) मुलांचा व मुलींच्या सहशालेय कार्यक्रमातील सहभाग व नेतृत्वगुणविकास यांच्यातील संबंध अभ्यासणे.

नि क र्ष : १) मुलांमुलींमधील सहशालेय कार्यक्रम सहभागामध्ये लक्षणीय फरक नाही. २) मुलामुलीचा एकुण सहशालेय कार्यक्रमातील सहभाग व नेतृत्व गुण विकास यामध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.

जाधव केशर रा. (२०११) शिक्षणशास्त्र पदविका (डी. एड.) प्रशिक्षणार्थ्यांच्या सूक्ष्म अध्यापन कौशल्य संपादनासाठी संगणक सहाय्यित अनुदेशन उपक्रमाची निर्मिती व त्याच्या परिणामकारकतेच्या अभ्यास.

उद्दि टे : १) सूक्ष्म अध्यापनातील अध्यापन कौशल्यांची निवड करून उद्‌बोधन करणे. २) प्रशिक्षणार्थ्यांची सूक्ष्म अध्यापन कौशल्ये विकसनासाठी संगणक सहाय्यित अनुदेशन कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या सूक्ष्म अध्यापन कौशल्य संपादनात लक्षणीय वाढ दिसून आली. म्हणजेच हा उपक्रम अध्ययन घडवून आणण्यासाठी उपयुक्त आहे.

पाटील सतीश उ. (२०१०) अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांच्या छात्राध्यापक सेवाकाल उपक्रमांचा अभ्यास.

उद्दिे टे : १) छात्राध्यापक सेवाकाळ कार्यक्रमाचे नियोजन व कार्यवाही यांच्या अभ्यास करणे. २) छात्राध्यापक सेवाकाळात छात्राध्यापकांची भूमिका अभ्यासणे.

नि क र्ा : १) छात्राध्यापकांना या उपक्रमांमुळे वेळेचे नियोजन, सहशालेय उपक्रमांचे, स्पर्धांचे आयोजन व नियोजन, अहवाल लेखन योग्य प्रकारे करता आले. या उपक्रमाचा फायदा शिक्षकी व्यवसायात १००% होईल असे १००% छात्राध्यापकांचे म्हणने आहे.

भारती कविता (२०१२) महारा ट्र राज्यातील शिक्षक–प्रशिक्षण महाविद्याल्यातील परिपाठातून मूल्यसंस्कार एक अभ्यास.
उद्दि टे :परिपाठातून वैयक्तिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, रा ट्रीय मूल्ये ही मूल्ये विद्यार्थ्यांत रूजविणे.
नि क र्ा : १) परिपाठातून वैयक्तिक मूल्ये, सामाजिक व रा ट्रीय मूल्ये यांची रूजवणुक विद्यार्थ्यांत दिसून येते. २) विद्यार्थ्यांतील वर्तन परिवर्तन त्यांच्या दैनंदिन वर्तनातून दिसून येते विद्यार्थ्यांत विचार व कृतीत सारखेपणा, नेतृत्वगुण, निर्भिडपणा, स्वच्छता, वक्तशीरपणा, श्रमनि ठा, शिस्तप्रिय ही मुल्ये विशे ाता दिसून येतात.

जेम्स कालडरहेड व मॉराईस रॉबसन 'अध्यापनाची प्रतिमा : प्रशिक्षणार्थ्यांचा सराव पाठांदरम्याचा संघ दृ ठीकोन' या ोधात १२ प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या बी. एड. च्या पहिल्या व र्ाच्या प्रशिक्षणात काय अनुभव मिळाला त्यावि ायी सांगण्यात आले आहे. सरावपाठघेतांना ाळेतील अनुभव बऱ्याचदा त्यांच्यावर प्रभाव टाकणारे होते. त्यांनी शिक्षकांनी आपले ज्ञान वाढवावे व प्रशिक्षणाचा दर्जा वाढावा म्हणून अधिक सोई सवलती उपलब्ध करावेत असे सांगितले.

चरीस कीरीयाकाऊ, स्विर्ड कुंळ, पॉल स्टेफन्स, हल्टग्रेन 'इंग्लंड आणि नॉर्वे मधील अध्यापन म्हणून पेशा स्वीकारतांना प्रशिक्षणार्थ्यांच्या अपेक्षा' या संशोधनाद्वारे लक्षात येते की प्रशिक्षणार्थ्यांच्या शिक्षक–शिक्षणाकडून काय अपेक्षा आहेत.
या व्यवसायात प्रशिक्षणार्थी मानतात की आपण एक सामाजिक प्रति ठा असलेली नोकरी स्विकारत आहोत. यात सुटया भरपूर असतात. बऱ्याच प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षकी व्यवसाय अधिक योग्य वाटतो त्याच्या विशे ा वि ाया पेक्षा (Specialist subject) आपल्या ताणग्रस्त काळात सुध्दा ते इतक्याच प्रमाणात संस्थेशी प्रामाणिक राहतील. १० पेक्षा जास्त व र्ा याच व्यवसायात राहण्याची आशा बाळगली.

बुटे ाांताराम (१९९८) 'विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता विकासात्मक उपक्रम'.
ाळांमध्ये विविध विकासात्मक उपक्रम हे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी कारणीभूत ठरते. आपल्या समोर येणाऱ्या बालकांमध्ये रा ट्राला घडविणारे संत, महंत, क्रांतीकारक, ज्ञानी, पराक्रमी, ाूर योद्धे असे अनेक महापुरू ा लुप्त असतात. त्यांच्यामधील या लुप्त गुणांचा विकास या विविध ैक्षणिक उपक्रमांमधून साधला जातो. एक–एक मूल्य या विविध ैक्षणिक उपक्रमाद्वारे त्यांच्यामध्ये रूजविली जातात व व्यक्तीमत्वाच्या विविध पैलूंचा विकास साधण्यास कारणीभूत ठरतात.

बोराडे भीमराव (१९९७) अध्यापनातून नैतिक मूल्यांचा समन्वय विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन :— विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना हेतुपूर्वक अनुभव देता आले. या विविध उपक्रमांमधून त्यांच्यामध्ये परस्परांवि ायीचे प्रेम, परस्परांवि ायीचा विश्वास वाढीला लावण्यास महत्वपूर्ण मदत झाली. सामूहिक उपक्रमातून चांगली समूह मने तयार झाली. यातूनच एकात्मभावना वाढीव लागली. संवेदन ीलतेचे मूल्य दिसून आले. यासर्वांतूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. एकंदरीत विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो.

गॅरी डी, गॉड बाऊट व रॉबर्ट सी. (१९७४) 'शिक्षक प्रशिक्षणातील दोन प्रतिमानांची प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व आणि वृत्ती वर झालेली परिणामकारकता' १) वि ाय—वस्तु व अध्यापन कौशल्य २) अंतर व आंतर वैयक्तिक कौशल्य.
छात्र शिक्षकांच्या १३ गुणविशे ा — उपचार आंतरक्रियांच्या विश्ले ाणातून असे निदर्शनास आले की, ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी अंतर व आंतर वैयक्तिक गुणविशे ाांचा लाभ हा प्रशिक्षणाचा वैयक्ति दृ टीकोनातून घेतला त्यांना सरासरी पेक्षा कमी प्रमाणात दाखविला त्यांच्यासाठी वैयक्तिक मार्गदर्शन हवे आणि ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी वरील मापनाचा जास्त लाभ झाला त्यांना पारंपारिक कार्यक्रमातून अधिक लाभ होऊ ाकतो.

कार्टर के. केनेथ आणि इतर (१९८०) 'शिक्षक प्रशिक्षणाच्या उमेदवारांचे व्यक्तिमत्व वैशि टये व मूलभूत ौक्षणिक कौशल्यांच्या मुल्यांकनासाठी नार्दर्न केन्टकी विद्यापीठाचा कार्यक्रम'

शिक्षक—प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवेश घेण्याकरीता सदर विद्यापीठ प्राविण्य तपासणी करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश देतात.

महाविद्यालयाच्या पुढच्या व ार्ति चार प्रकारच्या चाचण्या होतात. (सामान्य जनतेवर) व्यक्तिमत्व वैशि टये आणि व्यावसायिक व ौक्षणिक आवड यांची मानसाशास्त्रीय तपासणी १६ PF द्वारा होते.

आवश्यक प्राविण्य मिळविणे नसल्यास प्रवेश नाकारला जाण्याची ाक्यता असते. अन्यथा त्या मार्गदर्शन करून प्राविण्य मिळविण्यास मदत करतात.

नंगे विल्यम (१९६५) 'शिक्षक प्रशिक्षणातील विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व हे व्यावसायिक वृत्ती आणि ौक्षणिक संपादन हे परस्परसंबंधित असते'.

शिक्षकाचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिक्षणाशिवाय इतर गो टींचा परिणाम होत असतो.

डेव्हिड आसुबेल यांच्या विचारांचा मागोवा अहंकाराचा विकास आणि अध्ययन यांचा संबंध पाहण्यासाठी घेण्यात आला. अनेक मानसाशास्त्रीय चाचण्यांचा वापर या करीता करण्यात येतो. उदा. मिंनसोटा चाचणी प्रत्येक वर्गाचा शिक्षक व त्याच्या वर्गात या चाचणींचा ही उपयोग केला गेला.

संशोधन   ी   कि

''शिक्षक–प्रशिक्षणातील **(B.Ed.)** प्रात्याक्षिक उपक्रमांचा ग्रामीण व   ाहरी भागातील प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावरील प्रभावाचा अभ्यास''

कार्यात्मक व्याख्या

प्रस्तुत संशोधन   ी   कात व्यक्त झालेल्या संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या संशोधिकेला पुढीलप्रमाणे अभिप्रेत आहेत.

- शिक्षक – प्रशिक्षण :– शिक्षकी पेशास आवश्यक अध्यापन कौशल्ये विकसित करणारे प्रशिक्षण म्हणजे शिक्षक प्रशिक्षण.
- प्रात्याक्षिक उपक्रप :– शिक्षक पेशास आवश्यक अध्यापन कौशल्ये विकसित करण्याकरीता आवश्यक उपक्रम म्हणजे प्रात्याक्षिक उपक्रम.

  शिक्षक –प्रशिक्षण माहाविद्यालयाद्वारे राबविण्यात येणारे विविध उपक्रम
- ग्रामीण :– पायाभूत सोयी सुविधा असलेला भाग.
-   ाहरी :– आधुनिक सुखसुविधा असलेला भाग.
- प्रशिक्षणार्थी :– शिक्षक प्रशिक्षणाकरीता आलेले विद्यार्थी.
- व्यक्तिमत्व विकास :– व्यक्तिमत्व विकास म्हणजे आत्मविश्वास, अभिरूची, सर्जनशीलता, व्यवस्थापन कौशल्य, उपक्रमशीलता, प्रयोगशीलता, सहकार्यवृत्ती, समायोजन, सौजन्यशीलता, आत्मप्रकटीकरण, वेळेचे महत्व, समाजकार्य, संवेदनशीलता या व्यक्तिमत्व घटकांत प्रशिक्षणार्थ्यांचे उपक्रमाने झालेले बदल .
- प्रभाव :– प्रशिक्षणार्थ्यांनी प्रात्यक्षिक उपक्रमाचा स्विकारलेला अवबोधात्मक प्रभाव.

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे

संशोधनात कशाचा अभ्यास करणार आहोत? त्यातून काय साध्य होणार आहे? याकरिता सुरुवातीलाच उद्दिष्टे ठरवावी लागतात.

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधिकेने पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. ग्रामीण व शहरी भागातील अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा शोध घेणे.

२. ग्रामीण भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा स्त्री प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

३. शहरी भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा स्त्री प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

४. ग्रामीण भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा पुरुष प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

५. शहरी भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा पुरुष प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

६. ग्रामीण भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा स्त्री व पुरुष प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

७. शहरी भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्यक्षिक उपक्रमांचा स्त्री व पुरुष प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

संशोधनाच्या परिकल्पना :—

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील परिकल्पना मांडण्यात आल्या आहेत.

१. ग्रामीण व ाहरी भागातील अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्याक्षिक उपक्रमांमध्ये लक्षणीय फरक नाही.

२. ग्रामीण भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्याक्षिक उपक्रमांचा स्त्री व पुरू ा प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावांमध्ये लक्षणीय फरक नसतो.

३. ाहरी भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्याक्षिक उपक्रमांचा स्त्री व पुरू ा प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावांमध्ये लक्षणीय फरक नाही.

४. ग्रामीण व ाहरी भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्याक्षिक उपक्रमाचा ग्रामीण स्त्री व ाहरी स्त्री प्रशिक्षणार्थी यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावांमध्ये लक्षणीय फरक नाही.

५. ग्रामीण व ाहरी भागातील शिक्षक प्रशिक्षणातील प्रात्याक्षिक उपक्रमाचा ग्रामीण व ाहरी पुरू ा प्रशिक्षणार्थी यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावांत लक्षणीय फरक नाही.

६. ग्रामीण व ाहरी भागातील प्रात्याक्षिक उपक्रमाचा स्त्री व पुरू ा प्रशिक्षणार्थी यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या प्रभावांत लक्षणीय फरक नाही.

प्रस्तुत संशोधनाची गृहीतके :—

प्रस्तुत संशोधनाकरीता संशोधिकेने पुढील प्रमाणे गृहीतके मांडलेली आहेत.

१. सर्वसामान्यपणे ग्रामीण व ाहरी भागामध्ये सर्व शिक्षक—प्रशिक्षण महाविद्यालयात प्रात्यक्षिक उपक्रम प्रशिक्षणार्थ्यांसाठी राबविले जातात.

२. सामान्यपणे अध्यापक महाविद्यालयामध्ये राबविल्या जाणाऱ्या प्रात्याक्षिक उपक्रमांचे तेथील प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर प्रभाव पडत असतो.

३. सर्वसामान्यपणे सर्वच प्रशिक्षणार्थी आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी सतत प्रयत्न करीत असतात.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या मुंबई शहर,मुंबई उपनगर,ठाणे ,रायगड ,रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांमध्ये असणाऱ्या शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित अशा १६ अध्यापक महाविद्यालयातील १००० प्रशिक्षणार्थी (बी.एड.) ची निवड करणार आहे.

प्रथम दर्शनी ही व्याप्ती जरी मुंबई विद्यापिठांतर्गत येणारे प्रशिक्षण महाविद्यालये व त्या महाविद्यालयातील प्रशिक्षणांपूरती मर्यादीत वाटत असली तरी सुध्दा मुंबई विद्यापीठाप्रमाणे महाराष्ट्रात अन्य विद्यापीठे आहेत आणि त्या विद्यापीठांतर्गत अशा प्रकारचे प्रात्यक्षिक उपक्रम राबविले जातात आणि म्हणून प्रस्तुत संशोधनातून येणारे निष्कर्ष महाराष्ट्रातील सर्वच शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांना लागु पडतील.

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करायला सुरुवात केल्यानंतर या विषयाची क्षितिजे खूप व्यापक आहेत असे निदर्शनास आले. हे व्यापक स्वरुप लक्षात घेऊन काही बाबींवर मर्यादा घालणे आवश्यक ठरते ते पुढीलप्रमाणे -

१) **विषय मर्यादा** — प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने अध्यापक महाविद्यालयामध्ये राबविले जाणारे प्रात्याक्षिक उपक्रम व त्यांच्या प्रशिक्षणार्थ्यांवर काय परिणाम होतो तेवढयापुरतेच मर्यादा आहेत.

२) **न्यादर्श मर्यादा** — प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या शासकीय अनुदानित व विनाअनुदानित अशा १६ महाविद्यालयातील १००० प्रशिक्षणार्थी निश्चित केले.

३) **माध्यम मर्यादा** – प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील केवळ मराठी माध्यमातील प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

४) **संशोधन पद्धती मर्यादा** – प्रस्तुत संशोधन हे सद्स्थितीशी निगडित असल्याने संशोधिकेने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीची निवड केली.

५) **साधने** – प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने प्रश्नावली व पदनिश्चयन श्रेणी या साधनाची निवड केली.

६) **भौगोलिक मर्यादा** – प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने मुंबई विद्यापीठांतर्गत येणारी मुंबई शहर नवी मुंबईतील,ठाणे,रायगड व रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांची निवड केली.

७) **सांख्यिकी** – प्रस्तुत संशोधनात टक्केवारी, मध्यमान, प्रमाण विचलन, T परिक्षिका ही सांख्यिकी तंत्रे मर्यादित केलीत.

८) **काळ मर्यादा** – सदर संशोधनाच्या अभ्यासाची व्याप्ती व स्वरुप पाहता प्रस्तुत संशोधनासाठी सुमारे २ वर्षाचा कालावधी संशोधिकेने निश्चित केले आहे.

संशोधन पद्धती :–

संशोधनाच्या स्वरुपावरुन संशोधनाच्या तीन पध्दती पडतात.

१) ऐतिहासिक संशोधन पध्दती
२) वर्णनात्मक संशोधन पध्दती
३) प्रायोगिक संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

✶ वर्णनात्मक संशोधन पध्दती :–

वर्णनात्मक संशोधन पध्दतीलाच काही वेळा आदर्श मूलक सर्वेक्षण म्हणतात. या संदर्भात आदर्शमूलक या शब्दातून आदर्शस्थिती अभिप्रेत आहे. आपण निरीक्षण करीत असलेली गोष्ट आदर्श आहे. कारण तशाच प्रकारच्या परिस्थितीत त्याची पुनारावृत्ती होऊ शकेल आणि त्याच गोष्टीचे आपल्याला परत निरीक्षण करता येईल.

बेस्ट यांच्या मते, वर्णनात्मक संशोधनात सत्य स्थिती काय याचे वर्णन आणि अर्थविवेचन करतात.

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी निगडीत असून सदर संशोधनात सद्यस्थितीत शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात कोणकोणते प्रात्याक्षिक उपक्रम राबविले जातात व त्यांच्या एकूण प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर काय प्रभाव होतो हे अभ्यासण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण या पध्दतीचा उपयोग करणार आहे.

सर्वेक्षण परिक्षणांतर्गत विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्वच्या अनेक घटकांचे मापन करणे आवश्यक आहे. प्रस्तुत सर्वेक्षणात प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मापन करणार आहे.

न्यादर्श :

एखादया विशिष्ट गटातील सर्व प्रतिसादकांना जनसंख्या हे नाव आहे. संशोधन प्रक्रियेमध्ये जी जनसंख्या असते तिच्या एककाचे परिणाम हे एक व्यक्ती , एक कुंटुब,एक गाव, एक तालुका, एक राज्य , एक देश असे संशोधनाच्या आवश्यकतेनुसार असू शकते. जनसंख्येचा प्रतिनिधी न्यादर्श यादृच्छिक न्यादर्श निवडण्याची संकल्पना पुढे आली. जेव्हा संपूर्ण जनसंख्येवर एखादया कारकाचा परिणाम होतो हे माहित करुन घेण्यासाठी प्रतिनिधी एकक निवडून त्या परिमाणाचे मापन केले जाते तेव्हा त्याला नमुना निवड म्हणतात.

नमुना निवड पध्दत:

नमुना निवडीच्या पध्दतीचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

न्यादर्श निवडीच्या पध्दती

संभाव्यता पध्दती

१) सुगम यादृच्छिक नमुना पध्दती
- लॉटरी पध्दती
- सारणी पध्दती
- ग्रीड पध्दती

२) नियमबध्द किंवा क्रमबध्द नमुना पध्दती
३) स्तरीया / वर्गीकृत नमुना पध्दती
४) बहुस्तरीय नमुना पध्दती
५) गुच्छ नमुना पध्दती

असंभाव्यता पध्दती

१) प्रासंगिक /सहजप्राप्त
२) निर्दि   टांश / हिस्सेवार
३) सहेतुक / सप्रयोजन

प्रस्तुत संशोधनाची न्यादर्श पध्दत :

प्रस्तुत संशोधनात मुंबई विद्यापिठांतर्गत येणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड करण्यात आली असून ही निवड असंभव्यता पध्दतीतील प्रासंगिक पद्धतीने केली जाईल.

निवड केलेल्या शिक्षण – प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीने जाणार आहे.

नमुना आकार

संपूर्ण अभ्यासक्षेत्र प्रशिक्षणार्थी संख्या १०००(N)

ग्रामीण महाविद्यालये (८) **ाहरी महाविद्यालये (८)**

स्त्री प्रशिक्षणार्थी (३००)	पुरू ा प्रशिक्षणार्थी (२००)	स्त्री प्रशिक्षणार्थी (३००)	पुरू ा प्रशिक्षणार्थी (२००)

एकुण ग्रामीण प्रशिक्षणार्थी ५०० **एकुण ाहरी प्रशिक्षणार्थी ५००**

प्रस्तुत संशोधनासाठी महारा ट्र येथील ६ विभागांपैकी कोकण विभागाची निवड केली आहे. कोकण विभागातील मुंबई विद्यापिठांतर्गत येणाऱ्या १६ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड असंभव्यता पद्धतीतील प्रासंगिक पद्धतीने करणार आहे. यात ८ महाविद्यालये ग्रामीण व ८ महाविद्यालये ाहरी आहेत. या १६ महाविद्यालयातील १००० प्रशिक्षणार्थ्यांची निवड संभाव्यता पद्धतीतील सुगम यादृच्छिक न्यादर्शातील लॉटरी पद्धतीने घेण्यात येणार आहे.

संशोधनाची साधने -

संशोधकाला संशोधनासंदर्भात विविध प्रकारची माहिती जमा करावी लागते. त्यासाठी विविध साधने उपलब्ध असतात. संशोधकला आपल्या संशोधनाला अनुसरुन योग्य अशा साधनाची निवड करावी लागते.

संशोधनासाठी संशोधन साधने :—

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली व पदनिश्चयन श्रेणीचा वापर करण्यात येणार आहे.

पदनिश्चयन श्रेणी :—

इंग्लिश जीवशास्त्रज्ञ **सर फ्रान्सिस गाल्टन** यांनी सर्व प्रथम पदनिश्चयन श्रेणी प्रचलित केली. एखादया वस्तुच्या परिस्थितीच्या किंवा व्यक्तिमत्त्वाच्या संबंधी मत किंवा वर्णनात्मक अंदाज प्रकट करणे म्हणजे पदनिश्चयन होय.

पदनिश्चयन श्रेणी हे नोंदीचे गुणात्मक साधन आहे. एखादया व्यक्तीमध्ये एखादे गुण किंवा वैशिष्टय किती प्रमाणात उपलब्ध आहे हे समजून घेण्यासाठी या साधनाचा उपयोग केला जातो. यासाठी तीन,पाच,सात,नऊ,असे बिंदू असलेल्या श्रेणी वापरता येतात. या श्रेणी पूर्वनियोजित असतात. जेवढया श्रेणी अधिक तेवढया प्रमाणात त्या गुणाच्या व वैशिष्टयांच्या विविधतेची किंवा भेदाची अधिक बारकाईने नोंद करता येते.

विद्यार्थ्यांच्या अंगच्या विविध कला त्यांच्यामधील गुण वैशिष्टये, विविध कार्यक्रमांत भाग घेण्याची पध्दती या गोष्टीचे मुल्यमापन या साधनाव्दारे करता येते.

प्रस्तुत संशोधनात शिक्षक प्रशिक्षणांतर्गत घेण्यात येणाऱ्या उपक्रमांचा प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावरील प्रभाव मापन श्रेणीसाठी पूर्णपणे सहमत, सहमत, सांगू शकत नाही, असहमत , पूर्णपणे असहमत या पाच बिंदू पदनिश्चयन श्रेणीचा वापर करण्यात येणार आहे .

प्रस्तुत संशोधनाची संशोधन साधने -

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी पुढील संशोधन साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

१) प्रशिक्षणार्थ्यांची वैयक्तिक माहितीपत्रक प्रशिक्षणर्थ्यांचे नाव, अध्यापक महाविदयालयाचे नाव, व ठिकाण प्रशिक्षणार्थ्याचे राहण्याचे ठिकाण, लिंग, वय, अध्यापन विषय या विषयी माहिती मिळविण्यासाठी वैयक्तिक माहितीपत्रक देण्यात येईल. याद्वारे मिळालेल्या माहितीचा उपयोग संशोधनाच्या यथार्थतेसाठी होईल.

२) शिक्षक प्रशिक्षक महाविदयालयातील उपक्रमांवर आधारीत मापन श्रेणी या पदनिश्चयन श्रेणी द्वारा शिक्षक–प्रशिक्षक महाविदयालयातील उपक्रमांचा कसा प्रभाव पडतो त्याविषयीची माहीती मिळाणार आहे. त्याकरीता स्वनिर्मित व्यक्तिमत्व मापनश्रेणी तज्ञांच्या व मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली निर्मित केली गेली . या मापनश्रेणी चा उपयोग प्रस्तुत संशोधनाकरीता करण्यात आला. उदाहरणादाखल पुढे दोन विधाने दिलेली आहेत.

व्यक्तिमत्व विकास मापन श्रेणी

अ. क्र.	विधाने	पूर्णपणे सहमत	सहमत	सांगू ाकत नाही	असहमत	पूर्णपणे असहमत
१	सूक्ष्म पाठाने सादरीकरणाने माझ्यात आत्मविश्वास निर्माण केला.					
२	सुक्ष्मपाठांनी माझ्यात नियोजनता हा गुण आणला.					

व्यक्तिमत्व मापन श्रेणीनुसार आधारीत विधाने यात दिलेली आहेत. या पदनिश्चयन श्रेणीतील पर्यायांपैकी योग्य पर्यायास गुण दिले जातील. ते पुढीलप्रमाणे -

पदनिश्चयन श्रेणीचे प्राप्तांक

अ. क्र.	पर्याय	सकारात्मक विधाने
१	पूर्णपणे सहमत	५
२	सहमत	४
३	सांगू शकत नाही	३
४	असहमत	२
५	पूर्णपणे असहमत	१

याच प्रमाणे प्रत्येक स्वभाव विशेषाला श्रेणीबध्द गुण दिले जाणार व नंतर निरनिराळया स्वभाव गुणांचे पदनिश्चयनाचे एकत्रीकरण करुन संकलित गुण काढले जाणार.

माहितीचे संकलन पद्धत –

समस्येचे निराकरण करण्याकरिता पुरावा म्हणून माहितीचे संकलन हे संशोधनात सर्वात महत्वाचे कार्य असते. आधारसामग्री जितकी बिनचूक व समर्पक असेल तितकेच संशोधन निष्कर्ष विश्वसनीय होण्याचा संभव जास्त असतो.

संशोधनाच्या संदर्भात कोणती माहिती मिळवायची, ती केव्हा मिळवायची व कशी मिळवायची, त्याचे नियोजन संशोधनाच्या सुरुवातीस हवे. मिळालेल्या माहितीच्या अर्थनिर्वचनासाठी कोणते संख्याशास्त्र वापरायचे हे सुध्दा आधीच ठरविणे आवश्यक असते. यामुळे संशोधन प्रक्रियेला एक दिशा मिळते. परिणामी संशोधनाची उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होते.

✶ संशोधनाची माहिती संकलन पद्धती-

प्रस्तुत संशोधनासाठी मुंबई विदयापीठांतर्गत येणारे मुंबई शहर, नवी मुंबईतील ठाणे, रायगड व रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील १६ शिक्षक – प्रशिक्षण महाविदयालयातील १००० शिक्षणर्थ्यांना संशोधनासंबंधी माहिती विचारली जाणार .

निवडलेला १६ महाविदयालयाच्या प्राचार्यांची परवानगी घेऊन त्यानंतरच त्यांनी दिलेल्या वेळेमध्ये बी. एड. महाविदयालयातील प्रशिक्षणार्थ्यांकडून पदनिश्चयन श्रेणी व प्रश्नावली भरुन घेण्यात येणार आहे .

माहितीचे अर्थनिर्वचन

संशोधन कार्यासाठी उद्दिष्टानुरुप मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करणे महत्वाचे असते. संशोधन कार्यासाठी मिळवलेल्या माहितीचे स्वरुप कशाप्रकारे आहे यावरुन

संबंधित माहितीचे विश्लेषण केले जाते. संशोधक माहितीचे संकलन करुन मिळविलेल्या पुराव्यावरुन विश्लेषण करतो व त्यावरुन माहितीचे संकलन करुन मिळविलेल्या पुराव्यावरुन विश्ल ाण करतो व त्यावरुन परिकल्पनांचा त्याग करायचा की स्वीकार करायचा हे ठरवतो. त्यावरुन तो अभ्यासकार्याचे निष्कर्ष काढतो. या सगळया परिस्थितीत त्याला संकलित माहितीची नोंद करावी लागते. तिचे वेगवेगळया दृष्टिने वर्गीकरण करावे लागते. या वारंवारिता पत्रकावरुन विविध गटांची मध्यप्रवृत्ती, गुणाची विचनलनशीलता ठरवावी लागते. संशोधकाच्या या सर्व कृतीला माहितीचे विश्लेषण म्हणतात.

सदर संशोधनासाठी माहितीच्या पृथ:करणासाठी वर्णनात्मक व अनुमानात्मक विश्लेषणाचा वापर करणार आहे. को टकीकरणानंतर माहितीचे विश्लेषण करत असताना केंद्रिय प्रवृत्तीचे मापन करताना मध्यमानाचा वापर करुन संकलित तथ्यांचे विश्लेषण केले जाणार आहे. त्याचप्रमाणे एकूण शोधनाच्या विचलनशीलतेने मापन करताना प्रमाण विचलनचा वापर केला जाणार आहे. परिकल्पना तपासण्यासाठी टी परिक्षिका (T- Test) चा उपयोग करण्यात येईल.

समारोप

आजचा विद्यार्थी चौकस, सुसंस्कृत, बहुश्रुत, कृतिशील व उपक्रमशील असणे आवश्यक आहे. कारण आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे म्हणून विद्यार्थ्यांना केवळ चाकोरीबध्द ज्ञान न देता त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशील असणे महत्वाचे आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रशिक्षणार्थ्यांना महाविद्यालयातून मिळणारे उपक्रम व प्रशिक्षणाचा परिणाम कसा होतो तेच पाहण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. 'सर्व शिक्षा अभियान'(२००१) तसचे 'सर्वांगीण ैक्षणिक गुणवत्ता विकास'या कार्यक्रमांतर्गत आता विद्यार्थ्यांच्या १०० टक्के पटनोंदणी व उपस्थिती एवढेच 'दर्जेदार शिक्षणाला' देखील प्राधान्य देण्यात आलेले आहे. ओघानेच विद्यार्थ्यांना दजेदार शिक्षण द्यावयाचे झाले तर प्रथमत: शिक्षकांची गुणवत्ता वाढणे आवश्यक आहे.

अनेक संबंधित संशोधन बघितले असता असे लक्षात आले की, शिक्षक प्रशिक्षणातील विविध उपक्रमातील एक किंवा दोन उपक्रमांवर संशोधन केलेले दिसून येते. प्रस्तुत संशोधनात मात्र एकंदरीत संपूर्ण व ाति घेण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावरील प्रभावाचा विचार करण्यात येणार आहे आणि हेच या संशोधनाचे महत्व आहे.

संदर्भ सूची

आपटे, वा.गो (१९९५) *मराठी शब्द रत्नाकर.* श्रीविद्या प्रकाशन पुणे.

बुटे ाांताराम (१९९८) *विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता विकासात्मक उपक्रम* भारतीय शिक्षण, भारतीय शिक्षण मंडळ मुंबई, पृ ठ क्र. ३८४.

बोराटे मनोज कांता (२०१०) *छात्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास* शिक्षणसमीक्षा ,नागपूर ,पृ ठ क्र. १६८.

बोराडे भीमराव (१९९७) *अध्यापनातून नैतिक मूल्यांचा समन्वय* शिक्षण संक्रमण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे ,पृ ठ क्र. २.

भगत (२००९) *शिक्षकांशी सुसंवाद* , चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर

भारती कविता (२०१२) *महारा ट्र राज्यातील शिक्षक – प्रशिक्षण महाविद्यालयातील परिपाठातून मूल्यसंस्कार – एक अभ्यास* शिक्षण संवेदन ,अनुराग प्रकाशन, कल्याण ,पृ ठ क्र. ३१

चरीस, कीरीयाकाऊ, रिचर्ड कुक, पॉल स्टेफन्स, हलटग्रेन (२००३) *इंग्लंड आणि नॉर्वे मधील अध्यापन पेशा स्वीकारतांना प्रशिक्षणार्थ्यांच्या अपेक्षा* , Educational Review VOL-55, ISSU 3, Page No. 255-263 .

कॉर्टर के. केनेथ आणि इतर (१९८०) *शिक्षक–प्रशिक्षणाच्या उमेदवारांचे व्यक्तिमत्व वैशि टे व मूलभूत ैक्षणिक कौशल्यांच्या मुल्यांकनासाठी नॉर्दर्न केन्टकी विद्यापीठाचा कार्यक्र* , ED 206565 .

देशपांडे ,ली. (१९९९) *शैक्षणिक मार्गदर्शक मालिका* ,य.च.म.मु.वि.नाशिक –२२

देव डी. एस. (१९८५) *शिक्षक प्रशिक्षण संस्थेतील सरावपाठा व्यतिरिक्त प्रात्यक्षिक कार्यक्रमाचा अभ्यास* , Survey of Research in Education New Delhi, NCERT, VOL No. II, Page No. 931.

घोंगडे राजु लक्ष्मण (२००९) *अनुदानीत व विनाअनुदानीत अध्यापक विद्यालयातील वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणारा परिणाम* , नागपूर विद्यापीठ ,नागपूर.

गॅरी डी. गॉड बाऊट रॉबर्ट सी. (१९७४) *शिक्षक–प्रशिक्षणातील दोन प्रतिमानांची प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यक्तिमत्व आणि वृत्ती वर झालेली परिणामकारकता* ED 091362 .

जमदाडे प्रकाश व पांढरे विद्युवता (२०१०) *बी. एड. प्रशिक्षणार्थीवर पर्यवेक्षित अभ्यास व लेखन प्रकल्प उपक्रमाचा झालेल्या परिणामकारकतेचा अभ्यास* शिक्षणसमीक्षा , संपादक मंडळ नागपूर ,पृ ठ क्र. ७७.

जगताप ,ह.ना (२००७) *शैक्षणिक व प्रयोगिक मानसशास्त्र,* नित्य नूतन प्रकाशन, पुणे .

जगताप ,ह.ना (२००७) *शैक्षणिक मानसशास्त्र* ,अनमोल प्रकाशन, पुणे.

जाधव ,के.रा (२०११) *कृतिसंशोधन* ,शुभाय प्रकाशन , मुंबई

जाधव केशर रा. (२०११) *शिक्षणशास्त्र पदविका (डी. एड.) प्रशिक्षणार्थ्यांच्या सूक्ष्म अध्यापन कौशल्य संपादनासाठी संगणक सहाय्यित अनुदेशन उपक्रमाची*

निर्मिती व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास
शिक्षणसमीक्षा , संपादक मंडळ नागपूर, पृ ठ क्र. १२३.

जेम्स कालडरहेड व मॉराईस रॉबसन (२००२) *अध्यापनाची प्रतिभा : प्रशिक्षणार्थ्यांचा सरावपाठा दरम्यानचा संघ दृ टीकोन* Teaching and Teacher Education VOL 7, ISSU 1, Page No. 1-8.

जोशी, लक्ष्मणशास्त्री (१९७६) *मराठी विश्वकोश* (खंड १)
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

जोशी, न. (१९९२) *आदर्श मराठी शब्दकोश,* विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे.

करदीकर ,सु (२००७) *शैक्षणिक मानसशास्त्र* ,फडके प्रकाशन ,कोल्हापूर.

कुळकर्णी के.वी. (२००७) *शैक्षणिक मानसशास्त्र* ,श्री विदया प्रकाशन ,मुंबई,३१

कौर एच आणि मिनाक्षी (२००६) *शिक्षक–प्रशिक्षण कार्यक्रमाचा बी. एड. विद्यार्थ्यांवर परिणाम*
Indian – Educational Abstracts (NCERT) New Delhi,
Page No. 57.

खान ए. एच. (१९८५) *विद्यार्थ्यांच्या संपादनात सूक्ष्म अध्यापन तंत्राची परिणामकारकता*
Forth survey of Research in Education NCERT,
New Delhi VOL No. II, Page No. 951.

लघाटे ाल्मली श्रीपाद (२००७) *शिक्षक प्रशिक्षणातील सूक्ष्म अध्यापन तंत्राच्या परिणामकारकतेचा* अभ्यास ,य.च.म.मु.वि.नाशिक .

मायगोंडा मलगोंडा (२००८) *शिक्षक–प्रशिक्षणार्थ्यांचा नेतृत्व वर्तन विकास*
शिक्षणसमीक्षा , संपादक मंडळ नागपूर ,पृ ठ क्र. ६७.

मुळे,रा.श.प्रा.उमाठे ,वि.तु. (१९८७) *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे,* महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर .

मोरे च, भिलेगावकर, स. (२००८) *शिक्षक शिक्षण* ,नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

मोहन के. (१९८०) *शिक्षक–प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता*
Third Survey of Research in Education, New Delhi,
VOL No. I, Page No. 822.

मोगरे विश्वास दौलतराव (२००४) *चंद्रपूर हरातील अध्यापक विद्यालयात छात्राध्यापकांच्या विकासाच्या दृ टीने घेण्यात येणाऱ्या अभ्यासपूरक कार्यक्रमांचे चिकित्सक अध्यायन* ,नागपूर विद्यापीठ ,नागपूर.

मोरे माधुरी (२००५) *नागपूर हरातील डी. एड. प्रशिक्षणार्थ्यांची अध्यापन अभियोग्यता आणि त्यांच्या व्यक्तिमत्व घटकांचा चिकीत्सक अभ्यास,* य.च.म.मु.वि.नाशिक .

नैगे विल्यम (१९६५) *शिक्षक–प्रशिक्षणातील विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व हे व्यवसायिक वृत्ती आणि ैक्षणिक संपादन हे परस्परसंबंधीत असते.*
ED 003697 .

नानकर,शिरोडे (२००७) *सुबोध शैक्षणिक व प्रयोगिक मानसशास्त्र* ,नित्य नूतन प्रकाशन,पुणे

परुळेकर आशा (२००७) *व्यक्तिमत्व कसे घडवाल* ,उन्मेश प्रकाशन, पुणे

पारसनीस,न.रा (२००७) *शिक्षकांचे प्रशिक्षण* ,नित्य नूतन प्रकाशन, पुणे

पारसनीस,न.रा (१९९६) *प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र* ,नूतन प्रकाशन, पुणे

पाटील सतीश उ. (२०१०) *अध्यापक विद्याल्यातील छात्राध्यापकांचा छात्राध्यापक सेवाकाळ उपक्रमांचा अभ्यास*
शिक्षण समीक्षा , संपादक मंडळ नागपूर , पृ ठ क्र. २०४

पोरखपूरकर (१९९९) *संशोधन मार्गदर्शक मालिका* , य.च.म.मु.वि. ,नाशिक .

पंडित, ब.बि. (२००८) *शिक्षणातील संशोधन* ,नित्य नूतन प्रकाशन,पुणे

प्रभुतेंडोळकर नितिन (२०१०) *नेतृत्वगुण विकसनात सहशालेय कार्यक्रमांची भूमिका*
शिक्षक मित्र ,कनकादित्य प्रकाशन,ठाणे.
Page No. 30

श्रीवास्तव कांतीमोहन (१९८२) *शिक्षक शिक्षक कार्यक्रमाची परिणामकारकता*
Forth survey of Research in Education NCERT, New Delhi VOL No. II, Page No. 994.

श्रीवास्तव मधुबाला (१९८९) *लखनौ विद्यापीठातील छात्र शिक्षकांच्या वृत्ती व अध्यापन कार्यक्षमतेवर शिक्षक शिक्षणाच्या कार्यक्रमाचा परिणाम*
Forth survey of Research in Education NCERT, New Delhi VOL No. II, Page No. 1492.

वर्तक च (२०००) *संशोधन मार्गदर्शक मालिका* ,य.च.म.मु.वि.नाशिक .

वर्मा प्रीति आर श्रीवास्तव डी.एन. (२००९) *सामान्य मनोविज्ञान* ,विनोद पुस्तक मंदिर आगरा.

Yadav S.K.(2008) *Research Methodology* , Niraj Publications, Delhi-6

यादव घमंडीलाल (१९९२) *प्रशिक्षणार्थ्यांच्या काही व्यक्तिमत्वातील वैशि टयांवर शिक्षक प्रशिक्षणाचा प्रभाव* Forth survey of Research in Education NCERT, New Delhi VOL No. II, Page No. 1498.